2 9 SEP 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांनी संशोधनाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे

## मंत्री चंद्रकांतदादा पाटील

## शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूलच्या इमारतीचे उद्घाटन

**। कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठांनी आता संशोधनाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देणे आवश्यक असून त्यासाठी त्यांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याची शासनाची भूमिका आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या (वाय.सी. एस.आर.डी.) नूतन इमारतीच्या रविवारी झालेल्या उद्घाटन समारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.



मंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठ स्तरावर अध्यापनाबरोबरच प्राध्यापकांनी संशोधनाकडे लक्ष पुरविणे ही काळाची गरज आहे. विद्यापीठाचे वीस संशोधक जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांमध्ये स्थान मिळवून आहेत, ही अभिमानाची बाब आहे. ही संख्या अधिक वाढविण्यासाठी नव्या पिढीमध्ये संशोधनाची आस वाढविणे आवश्यक आहे. प्राध्यापकांना त्यासाठी प्रेरित करणेही गरजेचे असते, याचे भान शासनाला आहे. त्यामुळे संशोधनासाठी लागेल तितका निधी देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकासासाठीही मदत करण्यात येईल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मकतेमुळे आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रयत्नांमुळे या इमारतीस मूर्त स्वरुप प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या सहकार्यामुळेच विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक आणि अभ्यागतांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पूर्व-पश्चिम भागास जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे कामही मार्गी लागू शकले. या दोन्ही बाबींसाठी विद्यापीठ परिवार त्यांच्याप्रती कृतज्ञ आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

सुरवातीला मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते कोनशिला अनावरण करून आणि फीत कापून इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले, तर संचालक डॉ. नितीन माळी यांनी आभार मानले.

कार्यक्रमास डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे, इनोव्हेशन, डॉ. सागर डेळेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. रघुनाथ ढमकले, स्वागत परुळेकर, डॉ. गिरीष कुलकर्णी, रमेश पवार, उपकुलसचिव रणजीत यादव, अमित कांबळे, विजय पोवार, वैभव आर्डेकर, शिवकुमार ध्याडे आदी उपस्थित होते.

### 'व्हॉट नेक्स्ट?' असा प्रश्न समोर

डॉ. शिर्के यांच्या रुपाने एक चांगले कुलगुरू येत्या दि. ६ ऑक्टोबरला पदउतार होत आहेत. त्यामुळे मंत्री म्हणून माझ्यासमोर 'व्हॉट नेक्स्ट?' असा प्रश्न उभा राहिला आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत विद्यापीठाचे अनेक प्रश्न मार्गी लावले, असे मंत्री पाटील यांनी आपल्या भाषणामध्ये कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या विषयी बोलताना सांगीतले. यावेळी कुलगुरु डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 SEP 2025
तरुण भारत



कोल्हापूर : आजरा महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत बोलताना शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभागाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे. सोबत प्राचार्य डॉ. अशोक सादळे, डॉ. विकास जाधव, डॉ. धनंजय पाटील, डॉ. सुनील चव्हाण व डॉ. इब्राहिम मुल्ला.

# ...तरच विद्यार्थ्यांचा क्रीडा विकास गतीने

- शिवाजी विद्यापीठ क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे
- केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणाची जोरकसपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारत सरकारने युवा पिढी भविष्याचा विचार करुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण बनवले आहे. यात क्रीडा व शारीरिक शिक्षणाचे महत्त्वही विशद आहे. शाळेपासून ते विद्यापीठस्तरापर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा बौद्धिक व शारीरिक विकास करणे हे या शैक्षणिक धोरणाचे मुळतत्व आहे. त्याची शाळा व महाविद्यालयांनी जोरकसपणे अंमलबजावणी केल्यास विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासासह सर्वांगिण विकास होण्याला वेळ लागणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभागाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले.

आजरा महाविद्यालयाच्यावतीने "राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील क्रीडा व शारीरिक शिक्षणाचे महत्त्व" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कोल्हापूर जिल्हा क्रीडा परिषद, शिवाजी विद्यापीठाच्या मान्यतेने आयोजित या कार्यशाळेचे डॉ. बनसोडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी आजरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सादळे हे होते.

महाविद्यालयातील क्रीडा संचालक व शारीरिक शिक्षण शिक्षकांना क्रीडा व शारीरिक शिक्षणातील टेक्निकल बाबी पटवून देणे, खेळाडूंकडून आधुनिक पद्धतीने सराव करवून घेणे, सामने खेळताना अथवा सराव करताना खेळाडूंना दुखापत झाल्यास फिजिओथेरपीस्टद्वारे ती कशी बरी करता येते हे सांगण्याचा उद्देश घेऊन कार्यशाळा आयोजित केली होती. यामध्ये पन्नासहून अधिक महाविद्यालयातील क्रीडा संचालक व शारीरिक शिक्षण शिक्षक सहभागी झाले होते.

कार्यशाळेच्या प्रारंभी आजरा महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. धनंजय पाटील यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, महाविद्यालयातील क्रीडा संचालक व शारीरिक शिक्षण शिक्षकांनी शैक्षणिक धोरणात क्रीडा व शारीरिक शिक्षणासंदर्भातील समाविष्ट बाबींमधील टेक्निकल बाजू समजून घेणे नितांत गरजेचे आहे. त्यांनी विभागीय, आंतरविभागीय, पश्चिम-दक्षिण व अखिल भारतीय या चार स्तरावर होत राहणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या पात्रतेचे निकष क्रीडा संचालक व शारीरिक शिक्षण शिक्षकांना समजावून सांगितले.

डॉ. विशालकुमार धापटे यांनी खेळाडूंना होणाऱ्या दुखापती व त्या बऱ्या करण्यासाठी फिजिओथेरपीची मदत घेणे का गरजेचे आहे, दुखापतीवरील प्रतिबंधक उपायांची माहिती सांगितली. डॉ. सुनील चव्हाण यांनी नव्या खेळातील नमुना नियमावलीवर प्रकाश टाकला. डॉ. इब्राहिम मुल्ला यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील क्रीडा व शारीरिक शिक्षणाचे स्थान अधोरेखित केले. यानंतर उपस्थित क्रीडा संचालक व शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. सादळे, अधीक्षक योगेश पाटील, प्रा. दिलीप संकपाळ, प्रा. मलिकार्जुन शिंत्रे, डॉ. रणजित पवार, प्रा. संदीप देसाई, डॉ. अप्पासाहेब बुडके, डॉ. प्रशांत पाटील, प्रा. निलेश कुलकर्णी, डॉ. निलेश पाटील, प्रा. विठ्ठल हाके आदी उपस्थित होते. डॉ. अशोक बाचुळकर यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 SEP 2025
पुढारी

# पंडित दीनदयाल उपाध्याय यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पंडित उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात करण्यात आला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. शरद बनसोडे, स्वागत परुळेकर, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. पवन गायकवाड, डॉ. एस. टी. कोंबडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 SEP 2025
तरुण भारत

# सॉफ्टबॉल आणि बेसबॉल स्पर्धेत कमला कॉलेजचे यश



मनपा सॉफ्टबॉल व बेसबॉल स्पर्धेतील विजयी संघासोबत प्रा. तेजस्विनी मुडेकर, ज्योती लेंगरे, पुजा ठाकूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

वालावलकर हायस्कूल येथे महानगपालिका अंतर्गत घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सॉफ्टबॉल व बेसबॉल स्पर्धेतमध्ये कमला कॉलेजने प्रथम क्रमांक प्राप्त केला. कॉलेजच्या सॉफ्टबॉल व बेसबॉल या स्पर्धेत दोन्ही संघाची कोल्हापूर विभागीय सॉफ्टबॉल व बेसबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत संघात कर्णधार दक्षता कामीरे, राजनंदनी वागवेकर, जान्हवी लोकरे, श्रेया सुतार, सिद्धी शिंदे, मनाली कांबळे, ज्योती कांबळे, स्वाती कांबळे, रिद्धी शिंदे, आदिती पोवार, अनुष्का झांबरे, तन्वी जाखले, गिरीजा विभुते, वैष्णवी जाधव, जान्हवी पाटील, गौरी जाधव, श्रुती चौगुले, वैभवी येडूरकर या खेळाडूंचा समावेश आहे.

विजयी सर्व खेळाडूंना ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य तेजस्विनी मुडेकर, एम. एन. जाधव ज्योती लेंगरे, क्रिडा शिक्षक पूजा ठाकूर, संदिप लंबे यांचे मार्गदर्शन लाभले.